# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/०५/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत दारू तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

पोलीस स्टेशन कुही हद्दीतील मांढळ परीसरात अडम रोडवर दारूची अवैध्य वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक २०/०५/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. पोलीस स्टेशन कुही येथील अधिकारी व स्टाफसह वरीष्ठांना माहिती देवून मा. भानुदास पिदुरकर, पोलीस निरीक्षक कुही यांचे नेतृत्वात मांढळ शिवारातील अडम येथील रोडवर जावून पेट्रोलींग करीता असता इसम नामे चंद्रशेखर भाउरावजी चनोडे हा आपले मोटारसायकलने येतांनी दिसला. त्याचे मोटारसायकलवर एक पांढऱ्या रंगाची प्लास्टिक चुंगडी दिसली. त्याची झडती घेतली असता प्लॅस्टिक चुंगडीमध्ये भिंगरी संत्रा नं. १ ची १८० एम.एल. चे ९६ निपा मिळुन आले. मोटरसायकल क्र. एम.एच.–४०/सी. के. ६०५५ किंमती ४५,०००/– रू. व ९६ निपा किंमती ६,७२०/– रू. असा एकुण किंमती ५१,७२०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून पुढिल कार्यवाही करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी राजा पवार, पो.नि. भानुदास पिदुरकर, पोउपनि, हरिहर सोनकुसरे, पो.हवा. चांगदेव कुथे, नापोशि. रोशन नारनवरे, पोअं. रंजीत मेश्राम यांचे पथकाने केली.



## खापरखेडा पोलीसाची कार्यवाही विटभट्टावरिल चोरीचा गुन्हा उघड

## ५ आरोपीसह ८८,५००/— रू. मुद्देमाल जप्त

दिनाक ११/०४/२०२४ ला मौजा बिना संगम रोडवर खुल्या जागेत सिमेंट व विटा तयार करणारी सिसांक ब्रिज नावाची कंपनीमधून विटा बनविण्याचे मशिन व इतर साहीत्य एकूण ६७,१००/— रू चा मुद्देमाल चोरी गेल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशन खापरखेडा दाखल झालेला होता. सदर गुन्हा झाल्यापासुन पोस्टे खापरखेडा येथील डी बी पथक हे आरोपीचा शोध घेत असता दिनाक १८/०५/२०२४ रोजी त्यांना यश मिळाले व **आरोपी १) शेख समीर शेख रहीम वय २४ वर्ष २) सलमान ताहीर हुसेन वय २१ वर्ष, ३) कपील दिन रंगारी वय १८ वर्ष ४) गगन नागराज थुल वय १८ वर्ष ५) दिलीप सोनेकर सर्व रा. कामठी** यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी बिना संगम रोडवर खुल्या जागेत सिमेंट व विटा तयार करणारी सिसांक ब्रिज नावाची कंपनीमधुन चोरी केल्याची कबुली दिली असल्याने त्याचे कडून एकूण ८८,५००/— रू चा मुद्देमाल जप्त केला पोस्टे खापरखेडा येथील डीबी पथकांना विटाभट्टीवरिल चोरीचा गुन्हा उघड करण्यास व मुद्देमाल हस्तगत करण्यास यश प्राप्त झाले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ याचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. संतोष गायकवाड, ठाणेदार धनाजी जळक, पोउपनि आरती नरोटे, डीबी पथक येथील पोलीस हवालदार प्रफुल राठोड, शैलेश यादव कविता गोंडाने पोलीस नायक मुकेश वाघाडे, राजु भोयर, पोशि राजकुमार सातूर यांचे पथकाने पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर